RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १४५(३)] मंगळवार, ऑक्टोबर ७, २०२५/ आश्विन १५, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३७१**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ७ ऑक्टोबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२४/प्र.क्र.७६/रस्ते-८.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक खाक्षेस-२०२३/प्र.क्र.४११/रस्ते-८, दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ द्वारे, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " म्हणून करण्यात आला आहे) च्या कलम ३ याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार नागपूर ते गोंदिया प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गास जोडणारा तिरोडा बायपास म्हणून संबोधण्यात येणाऱ्या या महामार्गामधील जमिनीला राज्य महामार्ग (विशेष) क्रमांक ०७(अ) म्हणून घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अधिनियमाच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्टामधील रकाना क्रमांक (४) यात नमूद केलेल्या अधिसूचना क्रमांकाद्वारे, महामार्ग प्राधिकारी-महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यास नागपूर ते गोंदिया प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गास जोडणारा तिरोडा बायपास [राज्य महामार्ग (विशेष) क्रमांक ०७(अ)] या महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयीन करणे यासाठी आवश्यक असलेली जमीन संपादित करण्याचा उद्देश घोषित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) अंतर्गत अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार, एक वर्षाच्या कालावधीत उक्त अधिनियमातील कलम १८ च्या पोट-कलम १ अंतर्गत अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्या नसल्याने सदर अधिसूचना अंमलात असणे बंद झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, अत्यावश्यक शासकीय कामकाजाच्या कार्यभारात वाढ झाल्यामुळे, अधिनियमातील कलम १८ मध्ये नमूद केल्यानुसार एक वर्षाच्या कालावधीत जमीन संपादन करण्याचे घोषित करणे शक्य झाले नाही व त्यामुळे राज्य शासनास, घोषणा प्रसिद्ध करण्याच्या उक्त एक वर्षाचा कालावधी पुढे एक वर्षापर्यंत वाढविण्याच्या प्रयोजनासाठी, शक्ती प्रदान करण्याकरिता महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) यात महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०२५ (२०२५ चा २७) अन्वये सुधारणा करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त घोषणा प्रसिध्द करण्याचा कालावधी वाढविण्यासाठी झालेल्या विलंबाचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात आहे असे महाराष्ट्र शासनाचे मत आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) व महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०२५ (२०२५ चा २७) च्या कलम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्टामधील रकाना क्रमांक (२) व (३) यात, अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या जिल्हा व तालुक्याच्या बाबत व रकाना क्रमांक (४) यात विनिर्दिष्ट केलेल्या शासकीय अधिसूचनाबाबत, रकाना क्रमांक (५) यात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून, उक्त घोषणा प्रसिद्ध करण्यास उक्त अधिनियमाचे कलम १८ च्या पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार आवश्यक असलेला कालावधी दिनांक २८ एप्रिल, २०२६ पर्यंत वाढवित आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र.<br>(१) | जिल्हा<br>(२) | तालुका<br>(३) | अधिसूचना क्रमांक<br>(४) | अधिसूचना प्रसिध्दीचा दिनांक<br>(५) |
|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | तिरोडा | खाक्षेस-२०२४/प्र.क्र.७६/रस्ते-८ | ०२-०३-२०२४ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
शासनाचे उप सचिव.

**PUBLIC WORKS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 7th October, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA HIGHWAYS ACT.

No. PPP-2024/C.R.76/Road-8.—Whereas the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Public Works Department No. PPP-2023/C.R.411/Road-8, dated the 9th February 2024, in exercise of the powers conferred by section 3 of the Maharashtra Highways Act (LV of 1955) (hereinafter referred to as "the said Act") has declared the lands described in the Schedule appended thereto to be a Highway and classified it as a State Highway (Special) Number 07(B) to be known as the Tirora Bypass Connector to Nagpur-Gondia Access Control Super Communication Expressway in the State of Maharashtra;

And whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 15 read with section 17 of the said Act, the Government of Maharashtra, *vide* Government Notifications Numbers specified in column (4) in the schedule appended herewith, declared its intention to acquire the land required by the Maharashtra State Road Development Corporation Limited,-the Highway Authority, for building, maintenance, management or operation of the Tirora Bypass Connector to Nagpur-Gondia Access Control Super Communication Expressway [ State Highway (Special) No.07(A) ] ;

And whereas, the notifications published under sub-section (*2*) of section 15 of the said Act for acquisition of land but as per provision of sub-section (*3*) of section 18 of the said Act no declaration under sub-section (*1*) of section 18 has been published within a period of one year from the date of publication of such notifications, therefore the said notifications ceased to have effect;

And whereas, due to increased workload of other urgent Government business, it was not possible to publish the declaration for land acquisition within a period of one year as provided under section 18 of the said Act; and therefore to empower the State Government to extend the said period of one year for publication of declaration for further period upto one year and for the purpose the Maharashtra Highways Act (LV of 1955) has been amended by the Maharashtra Highways (Amendment) Act, 2025 (Mah. XXVII of 2025) ;

And whereas, the Government of Maharashtra is of the opinion that circumstances exists justifying the delay in order to extend the period for publication of declaration.

Now, therefore, in exercise of powers conferred by the second and third provisos to sub-section (*3*) of section 18 of the of the said Act read with section 3 of the Maharashtra Highways (Amendment) Act, 2025 (Mah. XXVII of 2025), the Government of Maharashtra hereby extend the period for publication of declaration as required by sub-section (*3*) of section 18 of the said Act in respect of the Government Notifications specified in column (4) of the Schedule appended hereto with effect from the dates specified in column (5) appended thereto and in respect of Districts and Talukas as specified in columns (2) and (3), respectively appended thereto till 28th April 2026.

*SCHEDULE*

| Sr. No. (1) | Districts (2) | Talukas (3) | Notifications Numbers (4) | Date of commencement of Notifications (5) |
|---|---|---|---|---|
| 1. | Gondia | Tirora | PPP-2024/C.R.76/Road-8 | 02-03-2024 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANDEEP KHALATE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.